# 'सीईटी'ला बसलेल्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या आजपासून परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अंतिम वर्ष शेवटच्या सत्रातील राज्य सामाईक प्रवेश परीक्षेस (सीईटी) बसलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा बुधवारपासून (दि. १६) ऑनलाईन पद्धतीने सुरू होणार आहे. उन्हाळी सत्रामधील अंतिम वर्ष शेवटच्या सत्रास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षा ऑनलाईन, ऑफ़लाईन पद्धतीने ऑक्टोबरमध्ये विद्यापीठामार्फत घेण्यात आल्या आहेत. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.च्या ३५ विषयांचे ८८ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत: परीक्षेचे वेळापत्रक व परीक्षेचा डेमो विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# ‘विद्यापीठ अधिनियम ’साठी २४ सूचना

## युवक काँग्रेसचे अभिषेक मिठारी यांचा प्रतिसाद; मूल्यमापन होणार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

यूजीसीचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली ‘महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारणासाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा समिती’च्या उपसमितीद्वारे बैठक झाली. कायद्यातील सुधारणेसाठी सूचना व हरकती मागवल्या होत्या. युवक काँग्रेसचे अभिषेक मिठारी यांनी अभ्यास करून २४ सूचना मांडल्या आहेत.

यामध्ये विद्यार्थ्यांना विविध प्राधिकरणे, समित्या, परिषदांमध्ये प्रतिनिधित्व मिळण्यासाठी व त्यांचा धोरण व निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी, तसेच या सहभागाचा अवकाश व्यापक करण्यासाठी विविध सूचनांचा समावेश आहे.

विद्यार्थी परिषदांमध्ये प्रतिनिधित्वासाठी ‘संशोधन आणि विकास’ हा स्वतंत्र विभाग असावा, विद्यार्थी परिषदांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधी असावेत, अधिसभा यांच्यावर सदस्य म्हणून जाण्यासाठी राष्ट्रीय दर्जा असणाऱ्या पक्षांच्या अधिकृत विद्यार्थी संघटनांनी नामनिर्देशित केलेले विद्यार्थी प्रतिनिधी घेतले जावेत,

व्यवस्थापन परिषदेमध्ये विद्यार्थी परिषद अध्यक्ष हा निमंत्रित असण्याऐवजी पदसिद्ध सदस्य असावा, विद्या परिषद, विद्याशाखा, विद्यापीठ उप-परिसर मंडळ, अभ्यास मंडळे, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, माहिती व तंत्रज्ञान मंडळ, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सहचर मंडळ, नव उपक्रम व संशोधन मंडळ, संशोधन मंडळ इत्यादी सुमारे ११ प्राधिकरणांवर विद्यार्थी प्रतिनिधी नेमले पाहिजेत, विद्यार्थी परिषदांमध्ये अपंग आणि एलजीबीटीक्यू घटकांचे प्रतिनिधित्व असावे, आंतरविद्याशाखीय अभ्यास मंडळात आंतरविद्याशाखीय अभ्यास असणारा व सामाजिक कार्यात अग्रेसर असणारा सदस्य असावा, प्रासंगिक रिक्त पदे भरण्यासाठी असलेल्या स्थायी समितीमध्ये विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष सदस्य असला पाहिजे, अशा सूचनांचा यात समावेश आहे,

# सीमा भागात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी भाडेतत्त्वावर जागा घेण्यास तत्त्वतः मान्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सीमा भागात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी भाडेतत्त्वावर जागा घेण्यास व्यवस्थापन परिषद बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषद बैठक झाली. विद्यापीठाच्या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठ विकासासंदर्भात नियोजन करण्याबाबत चर्चा झाली. राष्ट्रीय सेवा योजना भवन, क्रीडा विभाग पायाभूत सुविधा आदी विषयांची जबाबदारी संबंधितांवर सोपविण्यात आली. राजर्षी शाहू लोकविद्या व लोकसंस्कृती केंद्र स्थापन करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. भारती पाटील, अमित कुलकर्णी व व्यवस्थापन परिषद सदस्य सहभागी झाले होते.

# त्या विद्यार्थ्यांची आज ऑनलाईन परीक्षा होणार

कोल्हापूर, ता. १५ : ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची अंतिम वर्षाची परीक्षा देता आली नाही. त्यांची आज परीक्षा होणार आहे. सकाळी ११ ते दुपारी ४ या कालावधीत वेगवेगळ्या सत्रात या परीक्षा होतील. या ऑनलाईन परीक्षेसाठी अधिकत्तर विद्यार्थी हे विधी (लॉ) अभ्यासक्रमाचे आहेत. राज्य सामाईक प्रवेश परीक्षेमुळे (सीईटी) शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाची परीक्षा देता आली नाही. त्यांची परीक्षा आज, बुधवारी ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. गुणांची एमसीक्यू स्वरूपात परीक्षा घेतली जाणार आहे. सकाळी अकरा ते दुपारी बारा, दुपारी एक ते दोन आणि दुपारी तीन ते चार या सत्रामध्ये परीक्षा होणार आहे. ऑक्टोबरमध्ये झालेल्या अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षेला गैरहजर राहिलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या पदवी आणि पदव्युत्तर 'कलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा गुरूवारी आणि शुक्रवारी होणार आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

# राजर्षी शाहू लोककला संवर्धन केंद्र विद्यापीठात उभारणार



- शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय
- २०२०-२१ विद्यापीठ हिरक महोत्सवी वर्षात विकासात्मक कामे करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे २०२०-२१ हे हिरक महोत्सवी वर्ष आहे. हिरक महोत्सवी वर्ष कसे साजरे करायचे यासंदर्भात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेची मंगळवारी बैठक घेण्यात आली. विद्यापीठात राजर्षी शाहू लोककला संवर्धन केंद्र उभारण्याचा निर्णय या बैठकीत एकमताने घेण्यात आला. हिरक महोत्सवी वर्षात विकासात्मक काम करण्यासाठी विविध समित्यांची नियुक्ती करण्यात आली. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

विद्यापीठाच्या हिरक महोत्सवी वर्षात नुसतेच कार्यक्रम करायचे नाहीत तर नियोजन समित्यांच्या माध्यमातून विद्यापीठाचा विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला. वर्षभरात आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांना व्याख्यानासाठी बोलवण्यात येणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्यासाठी ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर समिती. संजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सेंटर ऑफ एक्सलंट समिती. अमित कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजना भवन समिती. निखिल गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी विकास समिती. डॉ. भारती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लोककला संवर्धन समिती नेमण्यात आली आहे. विद्यापीठात म्युझियम कॉम्प्लेक्स आणि यशवंतराव चव्हाण रूरल डेव्हलपमेंट सेंटरच्या सुधारणेची जबाबदारी डॉ. पाटील यांच्यावर देण्यात आली आहे. या समित्यांच्या माध्यमातून हिरक महोत्सवी वर्षात क्रीडा, कला, संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुधारणा केल्या जाणार आहेत.

### लोककला संवर्धन केंद्राला शासन निधी मिळवण्यासाठी प्रयत्न

राजर्षी शाहू लोककला संवर्धन केंद्रात भारतातील पारंपारिक कलांचे संवर्धन केले जाणार आहे. या केंद्रासाठी शासनाकडून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. तसेच केंद्र शासनाच्या विविध योजनांमधून विद्यापीठाला निधी मिळवण्याचा निर्णय घेण्यात आला.

### प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार

शिवाजी विद्यापीठाचे नूतन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी भौतिकशास्त्र, नॅनो सायन्स अधिविभागप्रमुख म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. दोन विभागाच्या प्रमुख पदाचा कार्यभार सांभाळताना लोकोपयोगी संशोधन केले. अनेक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी परदेशी जाण्यासाठी मदत केली. आंतराष्ट्रीय संस्थांबरोबर विद्यापीठाचा सामंजस्य करार करण्यात त्यांचे मोलाचे सहकार्य आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन प्र-कुलगुरूपदी निवड झाली आहे. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यापीठ कायद्याची अंमलबजावणी व्हावी

## विद्यापीठ कायदा समितीच्या उपसमितीपुढे संघटनांच्या सूचना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून नवीन कायद्यांची अंमलबजावणी व्हावी. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कोटा असावा. व्यवस्थापन परिषदेत विद्यार्थी परिषद अध्यक्ष हा निमंत्रित असण्याऐवजी पदसिद्ध सदस्य असावा अशा विविध सूचना 'मनविसे', मराठा आरक्षण विद्यार्थी कृती समिती, शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती, युवक काँग्रेसने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा समितीच्या उपसमितीपुढे मांडल्या.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात उपसमितीने मंगळवारी (दि.१५) विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधला. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे मंदार पाटील यांनी विद्यार्थ्यांना केंद्र मानून नवीन कायदे होणे व त्याची योग्य अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे सांगितले. मराठा आरक्षण विद्यार्थी कृती समितीचे ऋतुराज माने यांनी विद्यार्थी परिषद व अधिसभेवर सदस्य म्हणून जाण्यासाठी राष्ट्रीय दर्जा असणाऱ्या पक्षांच्या विद्यार्थी संघटनांनी नामनिर्देशित केलेले विद्यार्थी प्रतिनिधी घेतले जावेत, अशी सूचना केली. आजी-माजी विद्यार्थी कृती समिती शिवाजी विद्यापीठ यांचे प्रतिनिधी महेश राठोड यांनी दहावी-बारावी, पदवी शिक्षणात जसे क्रीडा क्षेत्रासाठी विशेष कोटा असतो, तसा कोटा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असावा अशी सूचना मांडली.



शिवाजी विद्यापीठातून...

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम कायद्यात सुधारण्यासाठी युवक काँग्रेसतर्फे २४ सूचना सादर करण्यात आल्या. विद्यार्थी परिषदांमध्ये प्रतिनिधित्वासाठी 'संशोधन व विकास' या स्वतंत्र विभागाचा समावेश असावा. व्यवस्थापन परिषदेत विद्यार्थी परिषद अध्यक्ष हा निमंत्रित असण्याऐवजी पदसिद्ध सदस्य असावा. विविध अधिकार, अभ्यास मंडळे आदी ११ प्राधिकरणांवर विद्यार्थी प्रतिनिधी नेमले जावेत. प्रासंगिक रिक्त पदे भरण्यासाठी असलेल्या स्थायी समिती मध्ये विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष सदस्य असला पाहिजे.

# तंत्रज्ञान विभागाला हवेत सहा प्राध्यापक

## विद्यापीठ प्रशासनाने कार्यवाही करण्याची गरज ; ३० सहायक प्राध्यापक पदे रिक्त

**ओंकार धर्माधिकारी :** सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या स्वयं अर्थसाहाय्य असणाऱ्या तंत्रज्ञान विभागात सहा अधिविभाग आहेत. या अधिविभागात एकही प्राध्यापक नाही. तंत्रज्ञान विभागात सध्या सहा प्राध्यापक, सहा सहयोगी प्राध्यापक आणि ३० सहायक प्राध्यापकांची आवश्यता आहे. सर्वसाधनांनी युक्त असणाऱ्या या विभागाला जर आवश्यक मनुष्यबळ मिळाले तर या विभागात अनेक शैक्षणिक आणि संशोधनात्मक उपक्रम राबवता येतील. राष्ट्रीय स्तरावरील मूल्यमापनासाठीही येथे प्राध्यापक भरती करणे आवश्यक आहे.**



शिवाजी विद्यापीठात २००८ साली तंत्रज्ञान विभागाची सुरवात झाली. हा विभाग सुरुवातीलापासूनच आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असून, ॲकॅडमिकली स्वायत्त आहे. अशाप्रकारे सुरू असणारा जिल्ह्यातील एकमेव विभाग होता. जागतिक बँकेच्या टेक्निकल एज्युकेशन क्वॉलिटी इंप्रुव्हमेंट प्रोग्रॅमअंतर्गत या विभागाला शैक्षणिक, साधने उपलब्ध करून देण्यात आली.

सध्या तंत्रज्ञान विभागांतर्गत सहा अधिविभाग आहेत. येथे अभियांत्रिकीचे सहा पदवी अभ्यासक्रम तर ५ पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवले जातात. विद्यार्थ्यांची संख्या, अभ्यासक्रम, विभागांतर्गत होणारे विविध शैक्षणिक उपक्रम यात हा विभाग जिल्ह्यात अग्रेसर आहे. गेट तसेच अन्य स्पर्धात्मक परीक्षांसाठी येथे विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाते. या शिवाय विभागांतर्गत कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी विद्यार्थ्यांची तयारीही करून घेतली जाते, मात्र अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे विभागाच्या कामकाजाला मर्यादा येतात. सध्या येथील तंत्रज्ञान विभागातील सहा विभागांना एकही प्राध्यापक नाही.

काही सहयोगी प्राध्यापक आणि सहायक प्राध्यापक यांच्यावर विभागाचा कारभार सुरू आहे. नियमानुसार किती विद्यार्थ्यांमागे किती प्राध्यापक असावेत याचे प्रमाण ठरलेले आहे, पण विद्यार्थी संख्या आणि प्राध्यापकांची संख्या यांचे प्रमाण येथे व्यस्त आहे. याचा परिणाम केवळ अध्यापनावर होतो, असे नाही. तर विविध प्रकारच्या मूल्यांकनावेळीही याचा विचार होतो.

(पूर्वार्ध)

### स्पर्धेत टिकण्यासाठीचे आव्हान

जिल्ह्यात अभियांत्रिकिचे शिक्षण देणाऱ्या काही संस्थांना विद्यापीठाने स्वायत्त दर्जा आहे. त्यामुळे विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागासमोर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा वेळी जर या विभागाला सर्वार्थाने सुसज्ज केले नाही, तर विद्यार्थ्यांचा ओढा अन्य संस्थांकडे राहील. त्यासाठीच येथील रिक्त पदे भरणे आवश्यक आहे.

**“ तंत्रज्ञान विभागातील रिक्त पदांच्या मुद्द्यावर विचार झालेला आहे. या विभागातील काही सहायक प्राध्यापकांना पदोन्नती देण्यात येईल. तसेच सध्या कार्यरत असणाऱ्यांना मुदतवाढही दिली आहे. यानंतर आढावा घेऊन नंतर कंत्राटी सहायक प्राध्यापकांची भरती करण्याचा निर्णय घेऊ.**

**- डॉ. डी. टी. शिर्के,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासमवेत डॉ. पंकज तिवारी, डॉ. एम. मूर्ती आदी.

# रेशिम संशोधनातून विद्यापीठाचे विकासात योगदान : डॉ. तिवारी

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या रेशीमशास्त्र विभागाने चांगले काम केले आहे. विद्यापीठाचे ग्रामीण विकासात मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन म्हैसूर येथील केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ.पंकज तिवारी यांनी केले. आज त्यांनी विद्यापीठाच्या रेशीमशास्त्र विभागामार्फत मार्गदर्शन प्राप्त यळगूड (ता. हातकणंगले) येथील आप्पासो झुंजार, राजेंद्र बागल यांच्या रेशीम शेतीला त्यांनी भेट दिली.

डॉ. पंकज तिवारी, सहसंचालक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एम. मूर्ती आणि सहसंचालक (यांत्रिकीकरण) डॉ. शिवकुमार हुक्केरी यांनी नुकतीच विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर एक्सलन्स आणि इनक्युबेशन इन सेरिकल्चरला' भेट दिली. येथे सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. विविध प्रक्षेत्रांना भेटी दिल्या. त्याचप्रमाणे कागल येथील रेशीम यांत्रिकीकरणासाठी लागणाऱ्या मशीन तयार करणाऱ्या प्रकल्पांना भेटी दिल्या. विद्यापीठात शेतकऱ्यांसाठी सुरू असलेल्या रेशीमशास्त्र पदविका, पदव्युत्तर पदविका प्रशिक्षण उपयुक्त ठरत असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. यावेळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. व्ही.एस. मन्ने, रेशीमशास्त्र सेंटरचे समन्वयक डॉ. ए.डी. जाधव उपस्थित होते.

# आता जिवाणूंमधील प्रतिजैविक प्रतिकारक्षमता निष्प्रभ करणे शक्य

## शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांचे संशोधन : एन्झाईमचा शोध

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध रोगांना कारणीभूत असणाऱ्या जिवाणूंमध्ये निर्माण होत असलेली प्रतिजैविक प्रतिकारक्षमता ही जागतिक स्तरावर भेडसावणारी एक प्रमुख आरोग्यविषयक समस्या आहे. या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागाच्या संशोधकांनी मूलभूत स्वरूपाचे संशोधन केले आहे. त्यात त्यांनी जिवाणूंमधील ही प्रतिजैविक प्रतिकारक्षमता निष्प्रभ करणे शक्य असल्याचे सिद्ध केले आहे.



डॉ. के डी सोनवणे

विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागातील संशोधक प्रा. डॉ. के. डी. सोनवणे आणि त्यांच्या चमूने अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स (एएमआर) या संदर्भात हे संशोधन केले आहे.

डॉक्टरांच्या सल्लानुसार औषधे अगर प्रतिजैविके त्याच प्रमाणात घ्यावयाची असतात; पण तसे न करता लोक स्वतःच स्वतःचे उपचार करू लागतात आणि त्याचे आरोग्यावर दुष्परिणाम संभवतात. केवळ जिवाणूजन्य आजारांवर प्रतिजैविके उपयुक्त असतात. मात्र सर्वच आजारांवर त्याचा प्रयोग केला जातो, हेही घातक आहे.

या औषधांचा अतिप्रमाणात अगर अयोग्य वापर केला असता विविध रोगांना कारक असणाऱ्या सूक्ष्मजिवांमध्ये प्रतिजैविक प्रतिकारक्षमता (अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स) निर्माण होते. या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेने सन २०१४ मध्ये प्रकाशित एका अहवालात, सध्या वापरात असलेली प्रतिजैविके काही वर्षांनंतर लाभदायक अगर परिणामकारक ठरू शकणार नाहीत, असा इशारा दिला आहे.

या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन या विषयावरील संशोधन सूक्ष्मजीवशास्त्र विभागाने केले. त्यात डॉ. सोनवणे यांच्यासह डॉ. ऋषिकेश परुळेकर, अस्मिता कांबळे, एस. आर. वाघमारे, एन. एच. नदाफ, सागर बराले यांचे योगदान आहे.

### काय आहे संशोधन?

जिवाणूंमध्ये ही प्रतिजैविक प्रतिकारक्षमता कशी निर्माण होते, या दिशेने संशोधन केंद्रित केले. या अंतर्गत जिवाणूंत प्रतिरोध निर्माण करणारे एक नवीन वितंचक (एन्झाईम) आढळून आले. त्या एन्झाईमचा सर्वकष अभ्यास या संशोधनांतर्गत करण्यात आला. त्या एन्झाईमचा प्रतिरोध करु शकणाऱ्या सेंद्रिय रेणूचाही (इन्हिबिटर) सूक्ष्मजीवशास्त्रीय व बायोइन्फॉर्मेटिक्स पद्धतींचा वापर करून शोध लावला आहे. या संशोधनावरील शोधनिबंध आंतरराष्ट्रीय विज्ञानपत्रिकांतून प्रसिद्ध झाले आहेत.

जिवाणूंमध्ये निर्माण होणारी प्रतिजैविक प्रतिकारक्षमता ही भविष्यात मानवी आरोग्यासमोरील मोठी आव्हानात्मक समस्या आहे. त्यावरील उपायांसंदर्भातील हे संशोधन भविष्यवेधी स्वरुपाचे आहे. -डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु


विद्यापीठातील हे संशोधन जिवाणूंत निर्माण होत असलेली प्रतिजैविक प्रतिकारक्षमता समजून घेणे व निष्प्रभ करण्याच्या दृष्टीने जागतिक स्तरावर उपयुक्त आहे. मानव, प्राणी व वनस्पती यांच्यावरील विविध रोगांवरील उपचारांसाठी प्रभावी ठरणारे आहे.
- डॉ. के. डी. सोनवणे

# जीवाणूंतील प्रतिजैविक प्रतिकारक्षमतेवर संशोधन

## प्रा. डॉ. के. डी. सोनवणे यांच्या चमूचे यश



डॉ. सोनवणे



**कोल्हापूर, ता. १५ : विविध रोगांना कारणीभूत असणाऱ्या जीवाणूंत निर्माण होत असलेल्या प्रतिजैविक प्रतिकारक्षमतेच्या आरोग्यविषयक समस्येच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागाच्या संशोधकांनी मोलाचे संशोधन केले. यात जीवाणूंमधील प्रतिजैविक प्रतिकारक्षमता निष्प्रभ करणे शक्य असल्याचे सिद्ध झाले आहे. संशोधक प्रा. डॉ. के. डी. सोनवणे आणि त्यांच्या चमूने अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स (ए.एम.आर.) संशोधन केले आहे.**

**काय आहे संशोधन?**

जीवाणूंत प्रतिजैविक प्रतिकारक्षमता कशी निर्माण होते, या दिशेने संशोधन झाले. जीवाणूंत प्रतिरोध निर्माण करणारे एक नवीन वितंचक (एन्झाईम) आढळून आले. एन्झाईमचा प्रतिरोध करू शकणाऱ्या सेंद्रिय रेणूचाही (इन्हिबिटर) सूक्ष्मजीवशास्त्रीय व बायोइन्फॉर्मेटिक्स पद्धतींचा वापर करून शोध लावण्यात यश आले. भविष्यात एखाद्या रोगाच्या जीवाणूत प्रतिजैविक प्रतिकारक्षमता आढळल्यास त्यावर मात करण्यासाठी संशोधन अत्यंत प्रभावी ठरणार आहे. प्रोटीन सिंथेसिस व मॉलेक्युलर जेनेटिक स्तरावर देखील संशोधन केले गेले. डॉ. सोनवणे म्हणाले, ''संसर्ग जीवाणू, विषाणू की, अन्य बुरशीजन्य स्वरुपाचा आहे, हे वैद्यकीय तपासणीतून निष्पन्न होते. त्यानंतर औषधाचा प्रकार व मात्रा डॉक्टर ठरवतात. ती औषधे अगर प्रतिजैविके त्याच प्रमाणात घ्यायची असतात. पण, तसे न करता लोक स्वतःच स्वतःचे उपचार करू लागतात. त्याचे आरोग्यावर दुष्परिणाम संभवतात. केवळ जीवाणूजन्य आजारांवर प्रतिजैविके उपयुक्त असतात. मात्र, सर्वच आजारांवर त्याचा प्रयोग केला जातो. ते घातक आहे. औषधांचा अतिप्रमाणात अगर अयोग्य वापर केला असता विविध रोगांना कारक असणाऱ्या सूक्ष्मजीवांत प्रतिजैविक प्रतिकारक्षमता निर्माण होते.''

**“ जीवाणूंत निर्माण होत असलेल्या प्रतिजैविक प्रतिकारक्षमता समजून घेणे व निष्प्रभ करण्याच्या दृष्टीने जागतिक स्तरावर अत्यंत उपयुक्त आहे. मानव, प्राणी व वनस्पती यांच्यावरील विविध रोगांवरील उपचारांसाठी प्रभावी ठरेल.**

**- डॉ. के. डी. सोनवणे**

**“ डॉ. सोनवणे व संशोधक चमूने आरोग्य समस्येचा वेध घेतला. या पुढील काळात संशोधकांकडून असेच संशोधन होत राहावे. यासाठी विद्यापीठाचे सर्वोतोपरी सहकार्य राहील.**

**- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के**

जर्नल ऑफ सेल्युलर बायोकेमिस्ट्री, ब्राझिलियन जर्नल ऑफ मायक्रोबायोलॉजी, प्लॉस वन, जर्नल ऑफ प्लँट बायोकेमिस्ट्री अँड बायोटेक्नॉलॉजी, जर्नल ऑफ प्रोटीन्स अँड प्रोटीओमिक्स व जर्नल ऑफ इथनोफार्मोकोलॉजीमध्ये संशोधन प्रकाशित झाले आहे. डॉ. सोनवणे, डॉ. ऋषिकेश परुळेकर, डॉ. अस्मिता कांबळे, डॉ. एस.आर. वाघमारे, डॉ.एन.एच. नदाफ, सागर बराले यांचे त्यात योगदान आहे.

# रेशीम शेतीविषयक मार्गदर्शनातून ग्रामीण विकासात मोठे योगदान

## केंद्रीय रेशीम संशोधन संस्थेच्या अधिकाऱ्यांकडून गौरवोद्गार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रेशीम शेतीविषयक माहिती व तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवून त्यांना सातत्याने आवश्यक मार्गदर्शन पुरविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाचे ग्रामीण विकासात मोलाचे योगदान असल्याचे गौरवोद्गार केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या वरिष्ठ शास्त्रज्ञांनी काढले.



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासमवेत केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ. पंकज तिवारी, सहसंचालक डॉ. एम. मूर्ती, डॉ. शिवकुमार हुक्केरी, डॉ. व्ही. एस. मन्ने, डॉ. ए. डी. जाधव आदी.**

केंद्रीय रेशीम संशोधन प्रशिक्षण संस्था तसेच केंद्रीय रेशीम मंडळ, म्हैसूर येथील संचालक डॉ. पंकज तिवारी, सहसंचालक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एम. मूर्ती आणि सहसंचालक (यांत्रिकीकरण) डॉ. शिवकुमार हुक्केरी यांनी नुकतीच शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर एक्सलन्स आणि इनक्युबेशन इन सेरिकल्चरला भेट दिली. येथे सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. कागल येथील रेशीम यांत्रिकीकरणासाठी लागणाऱ्या मशिन तयार करणाऱ्या प्रकल्पांना भेटी दिल्या.

विद्यापीठाच्या रेशीमशास्त्र विभागामार्फत मार्गदर्शन प्राप्त यळगूड (ता. हातकणंगले) येथील आप्पासाहेब झुंजार, राजेंद्र बागल यांच्या रेशीम शेतीला भेट देऊन पाहणी केली. जिल्हा नियोजन समिती, केंद्रीय रेशीम मंडळ, वस्त्र मंत्रालय यांच्या सहकार्याने तुती लागवड ते कापडनिर्मिती असे एकात्मिक मॉडेल विद्यापीठात उभे करण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी सदर अधिकाऱ्यांनी दर्शविली. या अधिकाऱ्यांनी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने, रेशीमशास्त्र सेंटरचे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते.


शिवाजी विद्यापीठ सूक्ष्मजीवशास्त्रज्ज्ञांचे महत्त्वपूर्ण संशोधन

# प्रतिजैविकांना निष्प्रभ करणाऱ्या जीवाणूंमधील 'एन्झाईम'चा शोध

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या शिरपेचात संशोधकांनी आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. प्रतिजैविकांना निष्प्रभ करणाऱ्या जीवाणूंमधील नव्या 'एन्झाईम'चा शोध या संशोधकांनी लावला आहे.

आंतरराष्ट्रीय विज्ञानपत्रिकांतून यासंदर्भातील शोधनिबंध प्रसिद्ध झाला आहे. विविध रोगांना कारणीभूत असणाऱ्या जीवाणूंमध्ये निर्माण होत असलेली प्रतिजैविक प्रतिकारक्षमता ही जागतिक स्तरावर भेडसावणारी पान २ वर ▸




विविध जीवाणूंमध्ये प्रतिजैविक प्रतिकारक्षमता निर्माण करणाऱ्या एन्झाईम्सची ही प्रतिरूपे.

## संशोधन रोगांवर उपचारासाठी प्रभावी



शिवाजी विद्यापीठात झालेले हे संशोधन जीवाणूंत निर्माण होत असलेल्या प्रतिजैविक प्रतिकारक्षमता समजून घेणे व निष्प्रभ करण्याच्या दृष्टीने जागतिक स्तरावर उपयुक्त आहे. हे संशोधन मानव, प्राणी व वनस्पती यांच्यावरील विविध रोगांवरील उपचारांसाठी प्रभावी ठरणारे आहे, असे डॉ. के. डी. सोनवणे यांनी सांगितले.

## प्रतिजैविकांना निष्प्रभ करणाऱ्या जीवाणूंमधील 'एन्झाईम'चा शोध

आरोग्यविषयक समस्या सोडविण्यास या संशोधनामुळे मोठी मदत होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागातील संशोधक प्रा. डॉ. के. डी. सोनवणे व त्यांच्या चमूने अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स (एएमआर) यासंदर्भात संशोधन केले आहे. साधा ताप किंवा सर्दी कशामुळे झाली याचा विचार न करता अँटिबायोटिक (प्रतिजैविक) औषधे घेतली जातात. ही सवय घातक आहे. संबंधित जीवाणू, विषाणू की अन्य बुरशीजन्य स्वरूपाचा आहे हे वैद्यकीय तपासणीतून निष्पन्न होते. त्यानंतर डॉक्टर औषधाचा प्रकार व मात्रा ठरवितात. काही लोक स्वतःच उपचार करू लागतात, त्यामुळे आरोग्यावर दुष्परिणाम संभवतात. जागतिक स्तरावरावरील समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन यासंदर्भातील संशोधन सूक्ष्मजीवशास्त्र विभागाने हाती घेतल्याचे डॉ. सोनवणे यांनी सांगितले.

> ❝ जीवाणूंमध्ये निर्माण होणारी प्रतिजैविक प्रतिकारक्षमता ही भविष्यात मानवी आरोग्यासमोरील मोठी आव्हानात्मक समस्या आहे. त्यावरील उपायांसंदर्भातील डॉ. के. डी. सोनवणे व त्यांच्या संशोधक चमूचे संशोधन भविष्यवेधी स्वरूपाचे आहे. विद्यापीठाचे संशोधकांना सहकार्य राहील.
>
> - डॉ. डी.टी. शिर्के, कुलगुरू

**काय आहे संशोधन?**

जीवाणूंमध्ये प्रतिरोध निर्माण करणारे एक नवीन वितंचक (एन्झाईम) आढळून आले. त्या एन्झाईमचा सर्वंकष अभ्यास संशोधनात करण्यात आला. त्या एन्झाईमचा प्रतिरोध करू शकणाऱ्या सेंद्रिय रेणूंचा (इन्हिबिटर) सूक्ष्मजीवशास्त्रीय व बायोइन्फॉर्मेटिक्स पद्धतींचा वापर करून शोध लावण्यात यश आले आहे. त्यामुळे भविष्यात एखाद्या रोगाच्या जीवाणूत प्रतिजैविक प्रतिकारक्षमता आढळल्यास त्यावर मात करण्यासाठी हे संशोधन प्रभावी ठरणार आहे. प्रोटिन सिंथेसिस व मॉलेक्युलर जेनेटिक स्तरावर देखील संशोधन करण्यात आले आहे. डॉ. सोनवणे यांच्यासमवेत डॉ. ऋषिकेश परुळेकर, डॉ. अस्मिता कांबळे, डॉ. एस. आर. वाघमारे, डॉ.एन. एच. नदाफ आणि सागर बराले या संशोधकांचे योगदान आहे.